डॉ. निशा भंडारे

# मराठी भाषा : माध्यम आणि तंत्रज्ञान : नवे प्रवाह


संपादक

प्रा.डॉ.सौ.शुभश्री काळे

प्रा.महादेव शेकडे




ISBN : 978-94-7892-89-9

# मराठी भाषा : माध्यम आणि तंत्रज्ञान (Media and Technology) : नवे प्रवाह

■ **संपादक :**
**डॉ. शुभश्री काळे**
**प्रा. महादेव रोकडे**
पत्ता : मराठी विभाग,
टिकाराम जगन्नाथ महाविद्यालय, खडकी,
पुणे–०३

■ प्रकाशन
ज्योस्त्ना मोरेश्वर नेरकर
शब्दवैभव प्रकाशन, पुणे
भ्रमणध्वनी : ८८५५८९०३०६/०७

■ प्रथमावृत्ती : ०४ फेब्रुवारी २०१७

■ मुखपृष्ठ :
मोरेश्वर नेरकर

■ मुद्रक/अक्षरजुळणी :
मोरेश्वर संतोष नेरकर
शब्दवैभव प्रकाशन, पुणे–४११००२
भ्रमणध्वनी : ८८५५८९०३०६/०७

■ मूल्य : स्वागत मूल्य १५०/–



## अणुक्रमणिका

भूमिका
मराठी विभाग रौप्यमहोत्सवी वाटचाल
शुभेच्छा– डॉ. मनोहर जाधव /११
वृत्तपत्राची वृत्त बांधिलकी: काही विचार– डॉ. सुधाकर शेलार /१३
नवनवीन माध्यमांमुळे मराठी भाषेपुढे निर्माण झालेली आव्हाने व उपाय–आनंद बल्लाळ/२२
दृक श्राव्य माध्यमांसाठी (आकाशवाणी व दूरदर्शन लेखन)– रवींद्र खासनीस/२६
सोशल मीडियावरील मराठी भाषेचे अस्तित्व, स्वरूप आणि भविष्य– व्यंकटेश कल्याणकर/३०
मराठी भाषेचे अस्तित्व, स्वरूप आणि भविष्य– प्रा. प्रज्ञा देसाई/३३
जाहिरातीसाठी संहितालेखन–प्रा. लिना शेंडे /३६
मराठी वृत्तपत्रीय जाहिरात– प्रा. अनिता भद्रे/४०
प्रसारमाध्यमांची भाषा : सामाजिक उपयोजन–डॉ. सुभाष आहेर/४८
१०. 'चित्रे व चिन्हांचा मराठी भाषिक रचनाबंध!'– डॉ. मधुकर मोकाशी/५३
११. मोबाईलमुळे मराठी भाषेच्या अभिव्यक्तीत झालेले परिवर्तन–डॉ. मंगला डोंगरे/५९
१२. वृत्तपत्रासाठी बातमीलेखन– डॉ.क्षीरसागर जी.एस./६६
१३. 'वृत्तपत्रमाध्यम आणि मराठी भाषा व्यवहार– डॉ. सुर्यवंशी प्रकाश/६९
१४. वृत्तपत्रासाठी बातमीलेखन–डॉ. सतेज दणाणे/७४
१५. आधुनिक प्रसारमाध्यमे आणि मराठीचे वर्तमान स्वरूप– डॉ. वैशाली भालसिंग/८१
१६. वृत्तपत्रासाठी बातमीलेखन– प्रा. मिनाक्षी गोणारकर/८५
१७. दूरचित्रवाणी प्रसारमाध्यमांतील मराठी भाषा–डॉ. नवनाथ दणाणे/८८
१८. दृक–श्राव्य माध्यमांसाठी (आकाशवाणी व दूरदर्शन लेखन)–प्रा. कमल दणाणे/९२
१९. उत्क्रांतीच्या वळणावर भाषा : प्रगती की अधोगती ?–सुशीलकुमार भा. शिंदे/१०१
२०. वर्तमानपत्र या प्रसारमाध्यमाचे योगदान –प्रा. तुषार प्रकाश भोसले/१०४

२१. 'दूरदर्शन' या माध्यमांमुळे मराठी भाषेपुढे निर्माण झालेली आव्हाने व उपाय
-प्रा. डॉ. सोमनाथ महादेव दडस/१०६
२२. वृत्तपत्र माध्यमाची भाषा ही सामाजिक न्यायाची असली पाहिजे -श्री. धनज
भिसे/१११
२३. वृत्तपत्रासाठी बातमीलेखन-डॉ. बाबासाहेब शेंडगे/११८
२४. दृकश्राव्य माध्यमांसाठी (आकाशवाणी व दुरदर्शन) लेखन- प्रा.डॉ.सुनिता डी
देशमुख/१२३
२५. आजचा युवक आणि स्मार्टफोन-डॉ. केतकी भोसले/१२८
२६. नवनवीन माध्यमांमुळे मराठी भाषेपुढे निर्माण झालेली आव्हाने व उपाय-
डॉ. गायकवाड मिलिंद धोंडिबा/१३२
२७. SOCIAL MEDIA AND CHANGED LANGUAGE- Gauri S. Matekar/138
२८. तंत्रज्ञान, माहितीच्या जगात मराठीचे अव्वल स्थान-डॉ. निशा भंडारे/१४४
२९. दूरचित्रवाणीवरील जाहिरातीसाठी संहितालेखन-डॉ. उमा काळे-माळी/१४७
३०. जाहिरातीसाठी संहितालेखन-दांगट शुभांगी सुभाष/१५१
३१. प्रसारमाध्यमे : काल आणि आज -संमिदर घोंक्षे/१६१
३२. मराठी भाषेवरील माध्यमांचा व तंत्रज्ञानाचा प्रभाव-प्रा. राजेंद्र खंदारे/ १६९
३३. महाजलावरील मराठी : शोध व बोध -शीतल गोर्डे-पाटील/१७३
३४. वृत्तपत्रासाठी बातमीलेखन- प्रा. वनिता बापू शिंदे/१७८



# भूमिका

**– प्रा. महादेव रोकडे**
**चर्चासत्र समन्वयक**

'प्रसारमाध्यमे' हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. समाजाची वैचारिक ांस्कृतिक जडणघडण करणे आणि समाजाला योग्य दिक्षा देणे ही जबाबदारी सारमाध्यमे आणि भाषा यांचा खूप जवळचा संबंध आहे. संवादाबरोबरच लेखन रण्यासाठीही भाषेची गरज असते. अशावेळी त्या त्या क्षेत्रातील भाषेचे ज्ञान सलेल्या भाषातज्ज्यांची आवश्यकता असते. भाषेवर प्रभुत्त्व असणारा भाषांतरकार, त्रकार, दुभाष्यक, कंटेन्ट रायटर, कॉपी रायटर, लेखक, प्रुफरिडर, संपादक, ाब्दकोशकार म्हणून काम करू शकतो. प्रसारमाध्यमांबरोबरच सोशल मिडीया ाणि इंटरनेटचा सर्वच वापर होत असताना अनेक संकेत स्थळे, तसेच विविध ॲप्सही आता प्रादेशि भाषेमध्ध्ये उपलब्ध होत असताना मराठी भाषेला केवळ एक भ्यासाचा विषय म्हणून पाहणे सोडले तर, भाषेसंबंधी क्षेत्रात अनेक संधी यापुढे पलब्ध होणार आहेत, प्रसारमाध्यमामधून उपयोजिलेल्या भाषेचा सखोल अभ्यास व्हावा, त्यातून भाषेचे बदलते स्वरूप, या संदर्भात व माध्यम आणि तंत्रज्ञानातील वे प्रवाह या बाबतीतही प्रसारमाध्यमांमधील संपादक, पत्रकार व मराठी भाषेचे भ्यासक, प्राध्यापक, विद्यार्थी यांचे एकत्र विचारमंथन व्हावे या हेतूने 'मराठी भाषाः माध्यम आणि तंत्रज्ञानः नवे प्रवाह' या विषयांवरील दोन दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

या चर्चासत्राचे उद्घाटन दि. ३ फेब्रुवारी २०१७ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु मा. डॉ. वासुदेवजी गाडे यांचे हस्ते संपन्न झाले. या प्रसंगी बीजभाषक म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रोफेसर व सुप्रसिद्ध समीक्षक मा. डॉ. मनोहर जाधव, संस्थेचे अध्यक्ष ॲड. एस. के. जैन, उपाध्यक्ष मा. कृष्णकुमार गोयल, प्राचार्य डॉ. अरूण मोकाशी, उपप्राचार्य अरूण शेलार, मराठी विभागप्रमुख डॉ. शुभश्री काळे उपस्थित होते. एकूण सहा समामंध्ये झालेल्या या चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभ प्रसंगी, 'सर्वच महाविद्यालयांमधून

**Digital communication on social media alters language use, it does not eradicate the traditional; it merely sits alongside convention.**


**REFERENCES:**

1. **Seargeant, P., Tagget. al. , 'The Language of Social Media', Palgrave Macmillan UK, 2014**
2. **Graddol David, '*The future of English?*' The British Council, 1997**
3. **Sophia Ananiadouet. A., *'White Paper Series the English Language inthe Digital Age'*, Springer, 2011**
4. John Reed, 18 June 2014,*'How social media is changing language'*, Oxford Dictionaries Blog
5. Carolyn Cohn,Social Media's Effect on Language, Retrieved from: https://smallbusiness.yahoo.com/advisor social-media-effect-language-181028156.html




# तंत्रज्ञान, माहितीच्या जगात मराठीचे अव्वल स्थान


**प्रा. डॉ. निशा भंडारे पुणे**


मानवी समाजात भाषेला, संवादाला अनन्य महत्त्व आहे. बदलत्या समाजमनातील वास्तव समजण्यासाठी भाषिक व्यवहार परिवर्तनशाही राहण्याचे श्रेय मातृभाषेत कार्यपद्धतीलाच द्यावे लागते. विविध क्षेत्रांत विविध स्तरांवर भाषेचे रूप बदलत जाते. जागतिकीकरणामुळे, तंत्रज्ञानामुळे भाषेने आपला चेहरामोहराच बदललेला दिसतो. हो, पण मूळ रूपात बदल झाला नाही. आज विविध प्रसारमाध्यमांचे जाळे पसरले आहे. मराठी भाषेचे स्थान अव्वल दर्जाचे आहे. मराठीचा सार्थ अभिमान संत ज्ञानेश्वरांपासून आपल्या 'नेट'वर्कच्या काळातही टिकून आहे.

'माझा मराठीचे बोलू कौतुके। परि अमृतातेही पैजा जिंके। ऐसे अक्षरे रसिके मेळविण।' मराठी भाषा आजही घरापासून संसदेपर्यंत शासन दरबारी मान्यता पावते व अंगणापासून दृक-श्राव्य माध्यमांपर्यंत लीलया खेळते, बागडते, नाते जोडते, यात महत्त्वाचा भाग मराठी भाषा आहे. यात संवादकौशल्य महत्त्वाचे आहे. उदा. आपण एखादी घटना ऐकतो ती जशीच्या तशी बातमीत मांडत नाही. जे श्रवण केले ते स्वीकारण्याची काही कौशल्ये आहेत. ती आत्मसात करून बातमी तयार करतो. भाषेतील श्रवण-कौशल्याचे महत्त्व स्पष्ट होते. वक्त्याच्या मांडणीवर श्रोता अवलंबून असतो. तेव्हा भाषेतील शब्द व वाक्य यांचा अर्थ समजणे, आवाजातील चढउतारामुळे होणारा अर्थातील बदल समजणे महत्वाचे आहे. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात व्हॉट्सॲपवर थोडक्यात माहिती पुरवली जाते. मोठ्या कथेचा सारांश केला जातो. नवीन शब्द निर्मिती होते. उदा. जेवणच्या ऐवजी 'जे १' टाईप केले जाते. you Mm u hmoVmo. where are you चा wh r टाईप केला जातो. भावनांसाठी स्माईली, थम, नमस्कारसाठीचे चिन्हे वापरले जाते. आजच्या काळात घरगुती कार्यक्रमांपासून सामाजिक, राजकीय स्तरावरील कार्यक्रमांत सूत्रसंचालन व निवेदनासाठी हुशार तरबेज, तीक्ष्णबुद्धी, हजरजबाबी, अनुभवी अशा सर्वगुणसंपन्न व्यक्तिमत्त्वाची आवश्यकता आहे. यासाठी साधे, सोपे पण प्रभावी शब्द वापरावे लागतात. यासाठी चांगली पुस्तके वाचावी. सुभाषिते, चारोळ्या, शेरोशायरीचे ज्ञान असावे लागते. कारण, सूत्रसंचालक वक्ता होण्यामधील दुवा महत्त्वाची कडी असते. येथे जास्त न बोलता अलिप्तपणे आपले कार्य करावे, म्हणजे सुरेश भटांच्या काही ओळी येथे चपखलपणे बसतात.

गुंतुनी गुंत्यात साऱ्या, पाय माझा मोकळा

रंगुनी रंगात साऱ्या , रंग माझा वेगळा

असेच आपले स्थान असावे. प्रसारमाध्यमांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे

**१. मुद्रित प्रसारमाध्यम, २. दृकश्राव्य प्रसारमाध्यम.**

मुद्रितमध्ये वेगवेगळ्या बातम्या, लेख, संपादकीय इत्यादींची छायाचित्रांसह छपाई येते, तर दृकश्राव्यात ऐकणे, पाहणे, मजकूर, अभिनय सादर होतो. हे अधिक प्रभावी माध्यम आहे. यासाठी संप्रेषण हा मानवी संस्कृतीचा अविभाज्य घटक आहे. मानवी जीवन समूहाशिवाय जगणे अशक्यच असते. गरजा भागविण्यासाठी संवाद साधावा लागतो. तेव्हा बोलणे म्हणजे ध्वनी यात ध्वनी आवज हे संप्रेषणाचे महत्त्वाचे साधन आहे. सर्व प्रकारच्या भावना व्यक्त होतात. विज्ञान तंत्रज्ञानाने क्रांतिकारक शोध लावल्याने संप्रेषणाला अधिक गतिमानता आली. दूरदर्शन, इंटरनेट ही दोन्ही माध्यमे जनसामान्यांच्या दैनंदिन जीवनाचा एक अविभाज्य घटक बनली. आहेत. जागतिकीकरणामुळे मोठी आंतरराष्ट्रीय बाजारपेठ झाल्याने भाषा कौशल्ये आत्मसात करण्याची गरज आहे. उदा.- हॉटेल व्यवसाय, टेलिकम्युनिकेशन, शेतकरी कॉलसेंटर. आजचे युग हे माहितीचे युग म्हणूनही ओळखले जाते. प्रसारमाध्यमे लोकशाहीचा चौथा खांब आहेत. जगभर माध्यमे घडणाऱ्या विविध घटनांची घटकांची माहिती सर्वसामान्यापर्यंत पोहचवते. या संप्रेषणाच्या भूमिकेत प्रसारमाध्यमे महत्त्वाची भूमिका बजावतात.

दृक-श्राव्य माध्यमात उद्घोषकाची भूमिका महत्त्वाची असते. श्रोत्यांच्या मनात सतत उत्सुकता जागृत ठेवणेही आवश्यक असते. उद्घोषणेसाठी सूचना, उत्सुकता, रोचकता निवेदनात असावी लागते. उच्चार काळजीपूर्वक समजेल अशी समतोल साधी भाषा वापरावी. विज्ञान, साहित्य, बातमी, नभोनाट्य अशी विविधता प्रसारण कार्यक्रमात असावी. माहिती ज्ञानाचा खनिज श्रोत्यांकडे करमणुकीच्या माध्यमांतून पोहचविणेही गरजेचे असते, तसेच रेखाचित्रांच्या आधाराने कमीत कमी शब्दांत जास्त परिणामकारकता जाणवते. ज्ञान मनोरंजनाबरोबर प्रबोधनही शेतकरी बांधवांसाठी प्रायोजित कार्यक्रम, हवामानाचा अंदाज, शासकीय योजना, कामगारांसाठी वेगवेगळ्या स्तरावरील माहिती इत्यादी.

उपरोक्त कार्यक्रमांसाठी नियोजनपूर्वक लेखन आवश्यक असते. त्यासाठी भाषिक कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे आहे. विस्तृत ज्ञान, आशयप्रधान संकलन, बिनचूक माहिती, कोटेकोरपणे मांडणी आवश्यक असते. नतंर याची मांडणी लय, हावभाव, चढउतार, शब्दबोध होण्यासाठी एका दृष्टीने तीन ते चार शब्द वाचावेत. डावीकडून उजवीकडे, वरच्या दिशेने ते खालच्या दिशेला वाचन करावे. वाचताना वेगवेगळ्या आकलनीय असावा. योग्य-अयोग्य, आवश्यक-अनावश्यक ठरवता यावे. या सगळ्यात व्यवहार वेळेची बचत नेटकेपणाने उचित अनुमान योग्य निष्कर्षाप्रत काढण्यासाठी लेखन



यातून आत्मविष्कार होतो.

लेखनाबरोबर श्रवण करणे हेसुद्धा साध्य झाले पाहिजे. सांगितलेली गोष्ट ऐकून जशीच्या तशी मांडणे, कारण पत्रकार परिषद नेत्यांच्या सभा, मुलाखती अशावेळी ही कला अपयुक्त ठरते. यासाठी पुढील गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. १. विषयाचे नेमकेपणे श्रवण व्हावे. २. आशय-विषय श्रोत्याला नीटपणे कळावा ३. मध्यवर्ती कल्पना समजणे. ४. वाक्प्रचार, म्हणींचे योग्य आकलन असावे. ५. श्रवणातील विषयासंबंधी स्वतःचे मत बनवून लेखन करणे.

वृत्तसंपादनातून जगाच्या पाठीवर कुठेही घडलेली घटना प्रत्यक्ष प्रेक्षकांपर्यंत पोहचवली जाते. पण आकाशवाणी, दूरदर्शनच्या वृत्तसंपादनातून फरक आहे. आकाशवाणीवरून परिणामकारक शब्दांत ऐकवली जाते, तर दूरदर्शनवर तीच बातमी अनेक संदर्भासह सादर केली जाते. यासाठी उत्कृष्ट संहितालेखन व तंत्राचा वापर केला जातो. यासाठी कॅमेरा, ध्वनिमुद्रणयंत्रणेचा अभ्यास करावा लागतो. कलेच्या क्षेत्रातील संगीत, चित्रपट, नाटक या विषयी समीक्षक म्हणूनही काम करता येते. या संदर्भात कलावंतांच्या मुलाखती घेणे. कलावंत व चित्रपटाशी संबंधित घटकांच्या घटाना बातमीस्वरूपात देत राहणे. शूटिंग, स्टुडिओचा फेरफटका, प्रिमियर शोला हजेरी लावणे, नविन माहिती मिहविणे चर्चासत्र, परिसंवादाचे वृत्तांत निहिणे आगामी चित्रपट, नाअकाचे कथाबीज प्रेक्षकांपर्यंत पोहचविणे या सगळयातून मराठी भाषेचे स्थान अव्यापच ठरते. म्हणूनच एकविसाव्या शतकातही तंत्रज्ञानाच्या युगातही आमची मराठी भाषा समर्थपणे उभी आहे.

**समारोप :**

प्रसारमाध्यमे, तंत्रज्ञानाच्या युगात दृक-श्राव्य माध्यमे, इंटरनेट, मोबाईल त्यांच्या तांत्रिक आणि अंगभूत गुणांमुळे अधिक प्रभावी ठरली. आकाशवाणी, दूरदर्शनवरील विविध वाहिन्यांमधून जग जवळ आणले. मराठी भाषेने यात ज्ञानदानाबरोबर मनोरंजनात आपले स्थान अबाधित ठेवले. शब्द भाषा संदेशनाचे महत्त्वाचे कार्य करत असल्याने आपल्या मनातील भावभावना श्रोत्यांपर्यंत पोहचविणे दृक-श्राव्य माध्यमातून शक्य होते. ग्रांथिक भाषा, बोलीभाषा दोन्हींचा वापर तारतम्याने कारावा लागतो. हेच यात सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे.

संदर्भग्रंथ :

१. कुंडले म. बा., 'मराठीचे अध्यापन', श्रीविद्या प्रकाशन, पुणे
२. केळकर केशव, 'दूरदर्शनसाठी लेखन'
३. नासिराबादकर ल. रा., 'व्यावहारिक मराठी', फडके प्रकाशन, कोल्हापूर
४. य.च.म.मु.वि., नाशिक, 'वाचन आणि लेखन कौशल्य'